# जाहिरात

प्राधिकरण क्षेत्रातील झाडांची देखभाल व इतर कामासाठी माळी/हेल्पर या पदांची बाह्यस्थ पध्दतीने सेतू समिती सिंधुदुर्ग मार्फत मानधनावर केवळ कंत्राटी स्वरुपात निव्वळ तात्पुरत्या कालावधीसाठी खाली नमुद केल्या प्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याचे आहे.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | नियुक्ती करावयाची संख्या | मानधन दरमहा प्रति मनुष्यबळ | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | माळी/हेल्पर (महिला) | (१) किमान चौथी पास, माळी कामाचा अनुभव असणे आवश्यक, सर्व प्रकारचे सफाई काम करण्याची क्षमता | ०२ | ९२६५/- | ११ महिने |

**परीक्षेचे स्वरुप -**

(१) माळी/हेल्पर (महिला)- ५० गुणांची तोंडी मुलाखत असेल.

(२) एखाद्या उमेदवाराने/अर्जदाराने त्याची निवड करण्यासाठी निवड समितीवरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकिय अथवा अन्य प्रकारने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

(३) अर्जामध्ये नमुद केलेली तसेच अर्जासोबत दिलेली माहिती अथवा प्रमाणपत्रे चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे निवड झालेली असल्याचे नंतर आढळून आल्यास संबंधीत उमेदवारास तात्काळ कमी करणेत येईल व संबंधीत उमेदवार भारतीय दंड संहितेचे कलम १९९, २००(२) अन्वये शिक्षेस पात्र राहील.

**कंत्राटी पदभरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे -**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि.११/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० ते दिनांक- १३/०२/२०२० रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत |
| २ | अर्ज छाननी करण्याचा कालावधी | दि.१४/०२/२०२० |
| ३ | पात्र उमेदवारांची तोंडी मुलाखत | दि.१५/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून |
| ४ | गुणवत्तेनुसार पात्र उमेदारांची निवड यादी प्रसिध्द करणे | दि.१७/०२/२०२० रोजी |

जाहिरातीमध्ये दिलेल्या सूचना/निर्देश/अटी-शर्ती यामध्ये बदल करण्याचा तसेच कोणतेही कारण न देता संपूर्ण कंत्राटी भरती प्रक्रियेची कार्यवाही रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष, जिल्हा सेतू समिती, सिंधुदुर्ग यांनी राखून ठेवलेले आहेत.

**माळी/हेल्पर या पदाकरीता विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग (सामान्य शाखा) येथे रक्कम रु. १००/- भरुन उपलब्ध होतील.**

**ठिकाण:- सिंधुदुर्गनगरी**
**दिनांक - ०७/०२/२०२०**

सही/-
**सचिव**
जिल्हा सेतू समिती सिंधुदुर्ग

**क्र.जिमाका/सिंधु./जाहि./१५० /२०१९-२०**